# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/12/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यु

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत शेडेश्वर ता. उमरेड येथे दिनांक 28/12/21 चे 16:00 वा. ते 16.30 वा. सुमारास सौ. बेबीताई अंकुश ठाकरे(मृतक), वय 48 वर्ष, रा. शेडेश्वर ता. उमरेड हि आपल्या शेतातील विहीरीचे पाणी काढण्याकरीता गेली असता तिचा पाय घसरून तोल जाऊन विहीरीच्या पाण्यात बुडुन ती मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अंकुश भाउराव ठाकरे, वय 55 वर्ष, रा. शेडेश्वर ता. उमरेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अजय चौधरी मो.क्र. 9823186686 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत झुल्लर रोड, वडोदा तह. कामठी जि. नागपूर येथे दिनांक 25/12/21 चे 15:30 वा. सुमारास सुरेश सदाशिव सहारे(मृतक) वय 66 वर्ष रा. वडोदा ता कामठी हे शेतात किटकनाषक फवारणी करीत असता ते त्या औषधावरुन बेशुदध झाले. त्यांची प्रकृत्ती खराब झाल्याने त्यांना उपचाराकामी भवानी हॉस्पीटल, पारडी येथे भरती केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी दि. 25/12/2021 चे 18.20 वा. मृत घोषीत केले. सदर मर्ग मृतकाचे मरणाबाबतचे पो.स्टे. पारडी नागपूर शहर येथून मर्ग क्र. 00/21 कलम 174 जाफौ चे कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई भुपेन्द्र गडीकर पो.स्टे. पारडी नागपूर शहर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल मो.क्र. 9834549675 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत बुधवारीपेठ उमरेड येथे दिनांक 24/12/2021 चे 10:00 वा. सुमारास बबन कोठीराम बेले (मृतक) वय 70 वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड यांना मागील 4 वर्षा पासुन पॅरालिसीस चा आजार असल्याने ते घरीच खाटेवर राहत होते. दि. 24/12/2021 रोजी सकाळी 05.00 वा. ते शौचास गेले असता त्यांचा तोल जावुन ते खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मुकामार लागला. त्यांना उपचारकामी प्रथम ग्रामिण रूग्णालय व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता दि. 26/12/2021 चे 08.00 वा. उपचारा दरम्यान डाक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. संबंधीत कागदपत्रे पो.स्टे. उमरेड येथे प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फ पोहवा विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक नितेश मेश्राम मो. क्र. 9326272364 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर